सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : १०९ | शुक्रवार, दि. ९ जानेवारी २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com






**श्री. सुभाष अण्णा चौधरी**
माजी नगराध्यक्ष



**डॉ. श्री. सचिन भावे**
भुलतज्ज्ञ



**श्री. दीपक पाटील**
सामाजिक कार्यकर्ता



**श्री. महेंद्रसिंग परदेशी**
रेल्वे विभाग



**श्री. बाळासाहेब बोरसे**
अमळनेर



**श्री. प्रसाद सोनार**
अमळनेर

# जळगावमध्ये बनतोय आणखी एक राष्ट्रीय महामार्ग

## मध्य प्रदेशातून थेट राजस्थानला जोडला जाणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जळगावमधून सध्या ५ राष्ट्रीय महामार्ग जातात. यामध्ये आता आणखी एका महामार्गाची भर पडणार आहे. हा महामार्ग महाराष्ट्राला मध्य प्रदेश आणि राजस्थानशी थेट जोडला जाणार आहे. कसा असेल हा नवा मार्ग, पाहा...

जळगाव जिल्ह्याच्या दळणवळण क्षेत्रात आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार आहे. जिल्ह्यातून जाणाऱ्या पाच राष्ट्रीय महामार्गांनंतर आता भुसावळ-चित्तोडगड (३४७ सी) या नवीन प्रस्तावित राष्ट्रीय महामार्गाला मंजुरी मिळाल्याने राजस्थानचा प्रवास अधिक वेगवान आणि सुखकर होणार आहे. या नवीन मार्गामुळे भुसावळ ते अजमेर दरम्यानचे अंतर तब्बल १५० किमीने कमी होणार आहे. प्रवासाच्या वेळेतही ५ ते ६ तासांची बचत होणार आहे.

हा प्रस्तावित महामार्ग महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि राजस्थान या तीन राज्यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा ठरणार आहे. या मार्गाचा आराखडा भुसावळ- पाल- खरगोन- धार- रतलाम- मंदसौर- नीमच- चित्तोडगड असा असेल. हा मार्ग भीलवाडामार्गे पुढे पुष्कर आणि अजमेर शहरांना जोडला जाईल. महाराष्ट्रात (जळगाव जिल्हा) साधारण ३६ किमी आणि मध्य प्रदेशात २०१ किमी अशा प्रमुख टप्प्यांतून हा मार्ग जाणार आहे. वेळेची, अंतराची मोठी बचत सध्या भुसावळहून चित्तोडगडला जाण्यासाठी बऱ्हाणपूर-इंदूर किंवा चोपडा-शिरपूर असे दोन मार्ग उपलब्ध आहेत. या दोन्ही मार्गांनी सुमारे ६०० किमीपेक्षा जास्त प्रवास करावा लागतो, ज्यासाठी १३ ते १४ तास लागतात. मात्र, नवीन महामार्ग पूर्ण झाल्यावर भुसावळ ते चित्तोडगड अंतर १५० किमीने कमी होईल. प्रवासाचा वेळ १३- १४ तासांवरून थेट ८ ते ९ तासांवर येईल.

जळगाव 'हायवे हब'च्या दिशेने जळगाव जिल्ह्यातून आधीच पाच महत्त्वाचे राष्ट्रीय महामार्ग जात आहेत. त्यात सुरत (गुजरात) ते पारादीप (ओडिशा), जळगाव ते दिगी पोर्ट, जळगाव ते मनमाड, इंदूर ते हैदराबाद, बऱ्हाणपूर ते अंकलेश्वर आता भुसावळ-चित्तोडगड हा सहावा महामार्ग जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा ठरणार आहे.



या महामार्गामुळे केवळ प्रवाशांची सोय होणार नाही, तर तिन्ही राज्यांमधील शेतीमाल आणि औद्योगिक कच्च्या मालाची वाहतूक जलद होईल. महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशच्या सीमावर्ती भागातील गावांचा कायापालट होऊन रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील. जळगावच्या बाजारपेठेला राजस्थान आणि मध्यप्रदेशातही मोठ्या शहरांशी जोडणी मिळेल.

# लालपरी बंद पडली तर विनाशुल्क करा शिवशाहीतून प्रवास

## प्रवाशांना मोठा दिलासा: परिवहन मंत्र्यांच्या आदेशानंतर महामंडळाने घेतला निर्णय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) लालपरी बस प्रवासादरम्यान अचानक बंद पडल्यास प्रवाशांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी बसमध्ये तांत्रिक बिघाड, अपघात किंवा अन्य कारणांमुळे प्रवास खंडित झाल्यास, त्या प्रवाशांना मागून येणाऱ्या कोणत्याही एसटी बसमधून मग ती साधी, निमआराम, शिवशाही, ई-शिवाई किंवा शिवनेरी असली तरी विनाशुल्क व तातडीने प्रवासाची सुविधा देणे आता बंधनकारक करण्यात आले आहे. या संदर्भात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सर्व विभाग नियंत्रकांना स्पष्ट आदेश दिले आहेत.

बसमधून प्रवास करताना बसच्या इंजिनमध्ये अचानक तांत्रिक बिघाड होणे, टायर पंक्चर होणे किंवा अपघात यासारख्या कारणांमुळे प्रवाशांना अडचणी येतात. त्यांचा प्रवासात खोळंबा होतो. मात्र, या प्रवाशांना मागून येणाऱ्या बसमध्ये बसवून न घेणाऱ्या किंवा प्रवेश दिला तरी तिकिटातील फरक वाहकांकडून आकारला जात असल्याच्या तक्रारी होत्या. या पार्श्वभूमीवर अलीकडेच परिवहन मंत्र्यांनी कडक कारवाईच्या सूचना एसटी महामंडळाच्या प्रशासकीय यंत्रणेला दिल्या आहेत. या निर्णयामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे. तसेच शिवशाही, ई-शिवाई, शिवनेरी या बसमध्ये प्रवेश नाकारल्यास किंवा फरकाच्या पैशासाठी अडवणूक केल्यास संबंधित वाहक-चालकांवर कडक कारवाईचा आदेशही परिवहन मंत्री यांनी दिला आहे.



**शिवशाही, ई- शिवाईत प्रवेश नसल्याच्या तक्रारी**

एसटी बसमधून प्रवास करताना बसच्या इंजिनमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाल्यास अशा वेळी मागून येणाऱ्या शिवशाही किंवा ई-शिवाईत या प्रवाशांना प्रवेश दिला जात नसल्याच्या तक्रारी एसटी महामंडळाकडे प्राप्त झाल्या होत्या.

**एसटी बंद पडल्यास पुढचा प्रवास कसा करायचा ?**

अनेकदा एसटी बसने प्रवास करताना काही वेळा तांत्रिक कारणांमुळे बस बंद पडतात किंवा बिघडतात. निर्मनुष्य ठिकाणी तसेच वाहतूक कमी असलेल्या ठिकाणी नियमित साधी बस बिघडल्यास प्रवाशांची अडचण होते. बस बंद पडल्यास पुढचा प्रवास कसा करायचा, असा प्रश्न पडतो.

**मागे येणाऱ्या कोणत्याही बसमध्ये प्रवासाची मुभा :**

परिवहन महामंडळाच्या बसमध्ये बिघाड झाल्यास प्रवाशांना त्याच तिकिटावर त्याच मार्गावर धावणाऱ्या अन्य एसटी बस तसेच उच्च श्रेणीची किंवा इव्ही असली तरी आता त्यातून त्याच तिकिटात प्रवास करता येणार आहे. त्यामुळे प्रवाशांना आता बिनधास्त प्रवास करता येणार आहे.

### भाडे फरकाच्या पैशांची केली जाते मागणी

लालपरी बंद पडल्यास पुढील बस कोणत्याही श्रेणीची असली, तरी ती प्रवाशांना तिकिटाचा फरक न आकारता आहे. त्याच तिकिटावर प्रवास करता येतो. मात्र, शिवशाही, ई-शिवाई, शिवनेरी अशा पर्यायी बसमध्ये भाडे फरकाच्या पैशांची मागणी वाहकांकडून केली जाते. याअनुषंगाने एसटी महामंडळाच्या वरिष्ठ कार्यालयाकडून सूचना दिलेल्या आहेत.

### नियमांचे पालन न केल्यास वाहक-चालकांवर कारवाई

अपघात, बिघाड आदी कारणांमुळे निम्न सेवेची बस बंद पडल्यास व त्याच मार्गावरून येणाऱ्या उच्च श्रेणी सेवेच्या बसमधून प्रवास अनुज्ञेय केलेला आहे. या सुधारित निर्णयानुसार कोणताही अधिकचा आकार, प्रवासभाडे फरक, आकारणी करू नये, असे निर्देश राज्य परिवहन महामंडळांच्या मध्यवर्ती कार्यालयाने दिले आहेत. अन्यथा दोषींवर नियमानुसार कारवाई केली जाणार आहे.

### तरीही बसमध्ये प्रवेश न दिल्यास कुठे तक्रार करावी?

प्रवासादरम्यान नियमानुसार एशिया, हिरकणी, शिवनेरी, शिवशाही, ई-शिवाई बसमध्ये प्रवेश नाकारल्यास आगारप्रमुख, वाहतूक नियंत्रक, विभाग नियंत्रकांकडे तक्रार करता येते. ५० टक्के सवलत महिलांना प्रवास भाड्यात देण्यात येत असल्यामुळे महिला प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. विशेष म्हणजे महामंडळाकडून महिलांना शिवशाही बसमध्ये देखील ही सवलत लागू आहे.

# जुनोने शिवारात बिबट्याचा वावर!

## शेतकऱ्यांचा दावा; ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील जुनोने शिवारात बुधवार, दि. ७ जानेवारी रोजी सकाळी बिबट्या दिसल्याचा दावा काही शेतकऱ्यांनी केला आहे. याबाबत वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी पाहणी केली आहे. मात्र, बिबट्या आढळून आलेला नाही. याबाबत ग्रामस्थांमध्ये भीतीचे सावट आहे. शेतकरी समाधान भीमसिंग पाटील बुधवारी सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास शेतात काम करत होते. यावेळी बिबट्या त्यांच्या पाठीमागे लागल्याचे त्यांनी सांगितले. ही माहिती त्यांनी ग्रामस्थांना दिली. तसेच ज्ञानेश्वर शांताराम पाटील हे रात्री ११ वाजच्या सुमारास शेतात पाणी सोडण्यासाठी गेले होते. त्यांनी बिबट्याचे दर्शन झाल्याचे सांगितले. भास्कर दगडू पाटील यांचे शेत भोणे शिवारात आहे. ते शेतात गेले असता शेताच्या कडेला बिबट्या दिसून आल्याचे त्यांनी सांगितले. या घटनेची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरली. ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. सरपंच रत्ना भगवान पाटील यांनी तातडीने वनविभागाशी संपर्क साधला. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी शेतशिवारात पाहणी केली. मात्र, त्यांना बिबट्या अथवा कुठलाही हिंस्र प्राणी आढळला नाही. कोणाला बिबट्या दिसल्यास त्वरीत वनविगाशी संपर्क साधावा, असे आवाहन सरपंच रत्ना पाटील यांनी केले आहे.






अमळनेर : रंबेल स्ट्रिपच्या कामाची पाहणी करताना माजी नगरसेवक मनोज पाटील व उपस्थित नागरिक.

# गलवाडे रस्त्यावर 'रंबेल स्ट्रिप'चे काम पूर्ण

## माजी नगरसेवक मनोज पाटलांच्या प्रयत्नांना यश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अत्यंत वर्दळीच्या असलेल्या येथील गळवाडे रोडवरील अपघातांना आळा बसावा, यासाठी दीर्घकाळापासून दाजीबा नगर, अंबिका नगर, साई गजानन नगर, ताराचंद नगर, प्रभुद्ध कॉलनी भागातील नागरिकांची मागणी होती. याबाबत नागरिकांनी माजी नगरसेवक मनोज पाटील यांच्याकडे गाऱ्हाणी मांडली होती. त्यानंतर माजी नगरसेवक मनोज पाटील व परिसरातील नागरिकांनी सर्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांचे याकडे लक्ष वेधले होते. पाठपुरावा करून ही समस्या सोडविण्याची मागणी केली होती.

मात्र, गलवाडे रस्ता हा राज्य मार्ग असून, उच्च न्यालयाच्या निर्णयाचे कारण देत अधिकाऱ्यांनी असमर्थता दर्शविली होती. मात्र, तरीही मनोज पाटील, हंसराज संदानशिव, तुषार संदानशिव व परिसरतील अनेक नागरिकांनी वारंवार आंदोलन केले होते. निवेदन देऊन आंदोलनाचा इशाराही दिला होता. याबबात सर्वांनी आमदार अनिलदादा पाटील यांच्याकडे जाऊन सर्व प्रकार कथन केला होता.

पान ३ वर

## दिनविशेष

८ जानेवारी

- क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली जन्मठेपेची शिक्षा झाली आणि तेहरानच्या जहाजातून एडनला नेण्यात आले.
- महात्मा गांधी आफ्रिकेतून भारतात आले
- नवीन सहस्राब्दीचा पहिला महाकुंभ मेळा अलाहाबादमध्ये सुरू झाला.
- महात्मा गांधी भारतात परतल्या बद्दल ९ जानेवारी हा भारतीय प्रवासी दिन म्हणून साजरा करण्याचे योजण्यात आले.

**एका निर्णयाने अख्खा समुद्र ५० वर्षात आटला**

पान २ वर



# पहला यूट्यूब चैनल फेल, ठगी का बनीं शिकार, फिर बंपर वापसी और अब करोड़ों की मालकिन



**सक्सेस स्टोरी**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जोधपुर के एक छोटे से गांव से निकली कौशल्या चौधरी की कहानी मिसाल है कि कैसे अपनी जड़ों और मातृभाषा पर गर्व करके सफलता के शिखर तक पहुंचा जा सकता है। एक बार यूट्यूब पर असफल होने के बाद भी उन्होंने हार नहीं मानी और मारवाड़ी संस्कृति को अपनी ताकत बनाया। आज उनका ब्रांड 'सीधी मारवाड़ी' शुद्ध, केमिकल-मुक्त मसालों और खाद्य पदार्थों के लिए जाना जाता है।

राजस्थान की साधारण ग्रामीण महिला से लेकर देश भर में ३९ स्टोर्स की मालकिन बनने तक कौशल्या चौधरी की कहानी साहस की मिसाल है। जोधपुर के एक छोटे से गांव से शुरू हुआ उनका सफर 'सीधी मारवाड़ी' ब्रांड के रूप में आज पूरे भारत में अपनी पहचान बना चुका है। एक असफल यूट्यूब चैनल से हार न मानते हुए कौशल्या ने अपनी मातृभाषा और पारंपरिक मारवाड़ी स्वाद को अपनी ताकत बनाया। आज उनका फूड ब्रांड न केवल केमिकल फ्री शुद्ध उत्पाद बेच रहा है, बल्कि ३५ से अधिक ग्रामीण महिलाओं को रोजगार और दर्जनों महिला उद्यमियों को फ्रेंचाइजी के जरिए आत्मनिर्भर बना रहा है। मास्टरशेफ इंडिया के टॉप १२ तक पहुंचने वाली कौशल्या का यह स्टार्टअप 'वोकल फॉर लोकल' का बेहतरीन उदाहरण है। आइए, यहां कौशल्या चौधरी की सफलता के सफर के बारे में जानते हैं।

**असफलता से सफलता का सफर**

कौशल्या चौधरी की डिजिटल यात्रा २०१७ में एक सस्ते स्मार्टफोन से शुरू हुई। उन्होंने 'ऑल इंडिया रसोई' नाम से हिंदी में कुकिंग चैनल शुरू किया, जो दो साल तक संघर्ष करने के बाद फेल साबित हुआ। लेकिन, कौशल्या ने हार मानने के बजाय अपनी जड़ों की ओर लौटने का फैसला किया। फरवरी २०१९ में उन्होंने अपनी मातृभाषा में 'सीधी मारवाड़ी' चैनल लॉन्च किया। मारवाड़ी भाषा और देसी अंदाज का जादू ऐसा चला कि महज एक महीने में उनके १ लाख सब्सक्राइबर्स हो गए। आज १७ लाख से ज्यादा लोग उनके साथ जुड़े हुए हैं, जो राजस्थानी संस्कृति और खान-पान के प्रति उनके अटूट प्रेम का प्रमाण है।

**डिजिटल प्रसिद्धि बनी बिजनेस का आधार**

सिर्फ वीडियो बनाने तक सीमित न रहकर कौशल्या ने कुछ ठोस करने का सपना देखा। २०२० में एक टेक वेंडर से ठगे जाने और ४ लाख रुपये गंवाने के बावजूद वह रुकी नहीं। इस बीच, अगस्त २०२३ में उन्होंने 'मास्टरशेफ इंडिया' में भाग लिया और ४०,००० प्रतिभागियों में से राजस्थान की एकमात्र प्रतियोगी बनीं जो टॉप १२ तक पहुंचीं। इस अनुभव ने उन्हें आत्मविश्वास दिया कि भारतीय पारंपरिक भोजन वैश्विक मंच पर जा सकता है। मार्च २०२४ में उन्होंने अपनी यूट्यूब कमाई से २० लाख रुपये निवेश कर 'सीधी मारवाड़ी' नाम से एक क्लीन-लेबल फूड स्टार्टअप लॉन्च किया।

**शुद्धता और महिला सशक्तीकरण का मेल**

जोधपुर स्थित यह ब्रांड मसाले, कोल्ड प्रेस्ड तेल, सूखी सब्जियां और अचार जैसे 30 से अधिक उत्पाद बेचता है। ये सौ टका प्राकृतिक और केमिकल मुक्त हैं। इस बिजनेस का सबसे खूबसूरत पहलू इसका सामाजिक ढांचा है। कौशल्या ने सीधे तौर पर ३५ से अधिक ग्रामीण महिलाओं को उत्पादन और पैकेजिंग के काम में लगाया है। इसके अलावा, ब्रांड के ३९ में से ज्यादातर आउटलेट्स महिला उद्यमियों की ओर से संचालित हैं, जो उन्हें आर्थिक रूप से स्वतंत्र बना रहे हैं। उनके पति भी इस सफर में कच्चे माल की सोर्सिंग और ब्रांड बिल्डिंग में उनके स्तंभ बनकर साथ खड़े हैं।

**बड़ी हैं भविष्य की योजनाएं**

कौशल्या का स्टार्टअप अब तक १० लाख से अधिक ग्राहकों को सेवा दे चुका है और बिना किसी बाहरी फंडिंग के मुनाफे में है। कौशल्या का टारगेट वित्त वर्ष २०२५-२६ तक भारत में १०० से ज्यादा स्टोर्स खोलने का है। वह अपनी पहुंच केवल भारत तक सीमित नहीं रखना चाहतीं। इसके बजाय वह अमेरिका, कनाडा और ऑस्ट्रेलिया जैसे अंतरराष्ट्रीय बाजारों में राजस्थानी स्वाद पहुंचाने की तैयारी कर रही हैं। उनका यह ब्रांड केवल एक व्यवसाय नहीं, बल्कि ग्रामीण संस्कृति, भाषा और पारंपरिक कलाओं को दोबारा जिंदा करने का एक सामाजिक-आर्थिक आंदोलन बन चुका है।

# जेवणासाठी वापरा 'ही' भांडी

## जेवणासाठी तर सुरक्षितच, खिशालाही परवडणारे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपण ज्या भांड्यांत जेवण करतो त्या भांड्याचा शरीरावर प्रभाव पडतो. त्यामुळे जेवण्याच्या भांड्यांची निवड करण्याआधी हे नक्की वाचा.  आपण ज्या भांड्यात जेवण करतो त्या भांड्याचा शरीरावर प्रभाव पडतो. त्यामुळे जेवण्याच्या भांड्यांची निवड करण्याआधी हे नक्की वाचा. अभ्यासातून हे समोर आले आहे, की काही भांड्यांच्या वापरामुळे शरीराला हानी पोहचते. त्यामुळे स्टेनलेस स्टीलची भांडी वापरणे उत्तम असते.

**स्टीलची भांडी वापरण्याचे फायदे :** कमी वेळात जेवण बनविण्यासाठी स्टेनलेस स्टीलची भांडी योग्य पर्याय असतात. स्टीलची भांडी लवकर तुटत नाहीत व दीर्घकाळ वापरता येतात. ती धुण्यास सोपी असून, डाग किंवा वास पटकन राहत नाही.
आहारासाठी सुरक्षित : स्टेनलेस स्टीलच्या भांड्यात लिंबू, टोमॅटो असे आंबट पदार्थ वापरले तरी फरक पडत नाही. यात बनवलेल्या पदार्थांचा रंग, चव बदलत नाही.

**जीवाणू टीकत नाही :** स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांना छिद्र नसतात, त्यामुळे त्यात खरकटे, दुर्गंधी, जीवाणू रहात नाहीत.
केमिकलपासून संरक्षण : नॉन्स्टिक भांड्यांसारखे यावर कोणतेही केमिकलचे कोटिंग नसते. जास्त गरम झाल्यावरसुद्धा यातून कोणताही गॅस किंवा धूर निघत नाही.
**हानिकारक धातूविरहित :** स्टेनलेस स्टीलमध्ये कोणत्याही हानिकारक धातूचा वापर केला जात नाही, त्यामुळे त्यात जेवण बनविणे सुरक्षित असते.
धुण्यासाठी सोपे : स्टेनलेस स्टीलची भांडी साबण वा पाण्याने धुतल्यास स्वच्छ होतात. स्टेनलेस स्टीलच्या भांड्यात कोणताही डाग वा जीवाणू रहात नाही.

**(येथे देण्यात आलेली माहिती गृहीतके आणि सामान्य माहितीवर आधारित आहे. अधिक महितीकरिता तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.)**

# फक्त सहा मिनिटांच्या डान्ससाठी तमन्ना भाटियाने किती घेतले मानधन ?

***ग्लोबल महातेज वृत्तसेवा***

*अभिनेत्री तमन्ना भाटिया तिच्या आयटम साँग आणि डान्समुळे तुफान चर्चेत असते. 'आज की रात', 'नशा' यांसारखी तिची गाणी खूप गाजली. त्यामुळे चित्रपट चर्चेत आणायचा असेल तर त्यात तमन्ना भाटियासाठी एक आयटम साँग ठेवण्याचा फंडा सध्या सुरू झाला आहे.*



*फक्त सहा मिनिटांच्या डान्ससाठी तीने तब्बल किती मानधन घेतले ? हे जाणून घेऊयात.*
*'जेलर' या चित्रपटातील 'कावाला', 'स्त्री २'मधील 'आज की रात', 'द बॅड्स ऑफ बॉलिवूड'मधील 'गाफूर' यांसारख्या गाण्यांनी तिला प्रचंड लोकप्रियता मिळवून दिली. त्यामुळेच तिला 'आयटम साँग क्वीन'चा टॅगही मिळाला आहे. आपले आयटम साँग तुफान गाजत असल्याचे पाहून तमन्नाने त्यासाठी तिचे मानधनसुद्धा वाढविले आहे. नवीन वर्षाच्या स्वागतासाठी गोव्यात एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात फक्त सहा मिनिटांच्या डान्ससाठी तिने तगडे मानधन घेतल्याचे कळते.*

*तमन्नाने गोव्यात झालेल्या एका भव्य न्यू इअर पार्टीत डान्स केला होता. या कार्यक्रमातील तमन्नाच्या दमदार नृत्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. जवळपास सहा मिनिटांसाठी तिने स्टेजवर परफॉर्म केले होते. मात्र, याच सहा मिनिटांच्या परफॉर्मन्ससाठी तमन्नाने तब्बल ६ कोटी रुपये मानधन घेतल्याचे समजते. ३१ डिसेंबर २०२५ रोजी गोव्याच्या बागा बीच इथल्या लास ओलास बीच क्लबमध्ये भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी तमन्नाने पंजाबी स्टार सोनम बाजवासोबत स्टेज शेअर केला होता.*

***तमन्नाचा डान्स***

*तमन्नाने तिच्या लोकप्रिय 'आज की रात' या गाण्यावर दमदार डान्स सादर केला होता. तिच्या डान्सचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. या व्हिडीओमधील तिची ऊर्जा आणि कमालीचा स्क्रीन प्रेंझेंस यांची चाहत्यांकडून प्रशंसा होऊ लागली. तमन्नाने तिच्या एका मिनिटाच्या डान्ससाठी एक कोटी रुपये मानधन स्वीकारलं आहे. कार्यक्रमात तिचा सहा मिनिटांचा परफॉर्मन्स होता. त्यासाठी तिने तब्बल सहा कोटी रुपये मानधन घेतले आहे. ही रक्कम सध्या चर्चेत असलेल्या साऊथ सुपरस्टार थलपती विजयच्या आगामी 'जन नायकन' या चित्रपटातील भूमिकेसाठी बॉबी देओलला मिळालेल्या मानधनापेक्षाही जास्त आहे. बॉबी देओलला या चित्रपटासाठी तीन कोटी रुपये फी मिळाल्याचे म्हटले जात आहे. तमन्नाच्या टीमकडून अद्याप तिच्या मानधनाबाबत कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आली नसली तरी या आकड्यामुळे मोठी चर्चा होत आहे. या कार्यक्रमात तमन्नासोबतच गायक मिलिंद गाबानेही परफॉर्म केले होते.*



# ताप आल्यावर तोंड कडू का होते ?

## त्यावर घरगुती उपाय काय ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तापामुळे शरीरात पाण्याची कमतरता निर्माण होते. ज्यामुळे लाळ कमी सुटते आणि जिभेच्या संवेदनांवर परिणाम होतो. जर तापासोबत सर्दी-खोकला असेल, तर जिभेवर कफाचे आवरण तयार झाल्यामुळे अन्नाची चव नीट कळत नाही. आजारपणात आपले रसनेंद्रिय म्हणजेच टेस्ट सेन्सर्स योग्य रितीने कार्य करू शकत नाहीत. तापात शरीराची पचनशक्ती मंदावते, त्यामुळे अन्न नीट न पचल्याने शरीरात विषारी घटक तयार होतात आणि तोंड कडू लागते. तोंडाची चव सुधारण्यासाठी 'डाळिंब' खाणे अत्यंत फायदेशीर ठरते. त्याचे कारण म्हणजे ते पचनास हलके आणि आरोग्यदायी असते. जेवताना जिभेला चव येण्यासाठी 'लिंबाचे गोड लोणचे' आहारात समाविष्ट करावे. पुदिना घातलेले कोमट पाण्यातील 'लिंबू सरबत' घोट-घोट प्यायल्याने तोंडातील कडूपणा कमी होण्यास मदत होते. तोंडाची चव वाढवण्यासाठी आवळा सुपारी किंवा आल्याचा तुकडा चघळणे हा एक उत्तम घरगुती उपाय आहे. किसलेले आले, लिंबाचा रस आणि काळे मीठ यांचे चाटण घेतल्याने केवळ तोंडाची चवच सुधारत नाही, तर भूकही वाढते.

## ग्लोबल वार्मिंगचा परिणाम

# एका निर्णयाने अख्खा समुद्र ५० वर्षात आटला

## उरले केवळ नाव आणि वाळूत जहाजांचे अवशेष



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जागतिक तापमानवाढ हा सध्या जगभरात चिंतेचा विषय आहे. जागतिक सरासरीपेक्षा जास्त तापमानाची नोंद अनेकदा झाली आहे. याच जागतिक तापमान वाढीने आणि मानवाने घेतलेल्या निर्णयाने अख्खा समुद्रच आटला आहे.

**समुद्र फक्त नावाला**

एकेकाळी उंच लाटा आणि भली मोठी जहाज वाहून नेणारा समुद्र फक्त ५० वर्षात कोरडाठक पडला. कजाकिस्तान आणि उज्बेकिस्तान यांच्या मधे असलेला अरल समुद्र आज फक्त नावाला उरला आहे.

**सोविएतचा प्रकल्प**

जगातला सर्वात मोठा इनलँड वॉटर बॉडी असणारा ६८ हजार चौरस किमी क्षेत्रात हा समुद्र पसरला होता. १९६०च्या दशतका सोविएत जलसिंचन प्रकल्पामुळे हा समुद्र आटायला सुरुवात झाली.

**जलसिंचन**

१९६० च्या दशकात सोविएत संघाने जलसंचिनासाठी कझाकिस्तान, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तानमध्ये कोरड्या मैदानावर पाणी वळवण्याचा प्रकल्प सुरू केला.



**पाणी वळवले**

उजबेकिस्तानमधील सिर दार्या आणि अमू दार्या या नद्यांचे पाणी वळवण्यात आले होते. त्यामुळे अरल समुद्रात या नद्यांचे जाणारे पाणी बंद झाले.

**समुद्र आटला**

नद्यांचे पाणी वळवल्याने सिंचन क्षेत्र वाढले पण समुद्र कोरडा पडला. अडीचशे ते तीनशे किलोमीटरपर्यंत पसरलेला समुद्र यानंतर आटायला सुरुवात झाली.

**वाचवण्याची धडपड**

समुद्र आटायला सुरू होताच कझाकिस्तानने अरल समुद्राच्या उत्तर आणि दक्षिण भागाच्या मधे एक धरण बांधले. मात्र, समुद्र पुन्हा त्या स्थितीत येणे शक्य झाले नाही.

वाळवंट

१९६० ते २०१० या अवघ्या ५० वर्षातच समुद्र कोरडा पडला. त्यात अनेक ठिकाणी जहाजांचे अवशेष आणि दूरवर पसरलेली वाळू दिसते.




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रेल्वेचे रुळ अनेकदा पाणी, पाऊस आणि ओलाव्याच्या संपर्कात असतात. तरीही त्यांना गंज लागत नाही किंवा ते लवकर खराब होत नाहीत. यामागचे नेमके कारण काय आहे, हे जाणून घेऊया.
भारतीय रेल्वेचे जाळे देशाच्या कानाकोपऱ्यात पसरलेले आहे. दररोज लाखो लोक रेल्वेने प्रवास करतात. स्वस्त भाडे आणि सोयीस्कर प्रवास यामुळे भारतात रेल्वे हा प्रवासाचा सर्वाधिक पसंतीचा पर्याय आहे. आपण ट्रेन पाहतो, पण कधी विचार केला आहे का की ट्रेन ज्या रुळांवरून धावते ते रुळ नेमके कोणत्या धातूपासून बनलेले असतात ? आणि बऱ्याचवेळा पाण्याच्या संपर्कात असूनही त्यांना गंज का लागत नाही ?
रेल्वेचे रुळ लोखंडाचे असतात का ?
बहुतेक लोकांना वाटते की रेल्वेचे रुळ लोखंडाचे असतात. मात्र, हे पूर्णपणे बरोबर नाही. रेल्वेचे रुळ साध्या लोखंडापासून बनवलेले नसतात.
रेल्वेचे रुळ कोणत्या धातूपासून बनतात ?
रेल्वेचे रुळ मँगनीज स्टील या विशेष प्रकारच्या स्टीलपासून तयार केले जातात. या स्टीलमध्ये सुमारे १२ टक्के मँगनीज आणि ०. ८ टक्के कार्बन असतो. या विशेष मिश्रधातूमुळे रुळांच्या वरच्या पृष्ठभागावर आयरन ऑक्साइडचा (गंजाची) थर तयार होत नाही. त्यामुळे रुळांना गंज लागत नाही.
रुळ तयार करताना त्यांना विशेष उष्णता प्रक्रिया आणि कठीण फिनिशिंग दिली जाते. त्यामुळे ते अधिक मजबूत, टिकाऊ आणि वजन सहन करण्यास सक्षम बनतात.
लोखंडाला गंज का लागतो ?
साध्या लोखंडाला पाणी आणि हवा हे मोठे शत्रू आहेत. जेव्हा लोखंड हवेत असलेल्या ऑक्सिजनच्या संपर्कात येते, तेव्हा त्याची रासायनिक प्रक्रिया होते. यामुळे लोखंडाच्या पृष्ठभागावर तपकिरी रंगाची आयर्न ऑक्साइडचा थर तयार होते, ज्यालाच आपण गंज म्हणतो.
मात्र, रेल्वेचे रुळ मँगनीज स्टीलचे बनलेले असल्यामुळे ही प्रक्रिया त्यांच्यावर परिणाम करत नाही आणि म्हणूनच रुळ वर्षानुवर्षे मजबूत राहतात.

.....................

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# महेश लांडगे म्हणाले ना. अजितदादा पवार महाराष्ट्राचे आका

## ना. अजितदादांनी चारच शब्दात विषय संपवला, नेमके काय म्हणाले?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार हे महाराष्ट्राचे आका आहेत, अशी जहरी टीका भाजप आमदार महेश लांडगे यांनी केली आहे. एक तर तुम्ही स्वतःचा भ्रष्टाचार लपवायला भाजपमध्ये आले आहेत. आधी स्वतःच्या लेकाचे पराक्रम पाहा, असे लांडगे म्हणाले होते. महेश लांडगे यांच्या टीकेला ना. अजितदादांनी प्रत्युत्तर दिले आहे. मी कोण आहे जनता ठरवेल, असे प्रत्युत्तर ना. अजितदादांनी महेश लांडगेंनी केलेल्या वक्तव्यावर दिले आहे.

नेमके काय म्हणाले होते महेश लांडगे?
महेश लांडगे म्हणाले, की मला पिंपरी चिंचवडचा ते आका म्हणतायेत, मुळात तेच महाराष्ट्राचे आका आहेत, असा पलटवार करत एकेकाळचे वस्ताद असलेल्या ना. अजितदादांना पैलवान महेश लांडगेंनी कुस्तीचे आव्हान दिले आहे. त्यामुळे आता खऱ्या अर्थाने पूर्वीचे वस्ताद अजितदादा विरुद्ध पैलवान महेशदादा अशी लढाई पिंपरी चिंचवडच्या आखाड्यात सुरु झाली आहे. सध्या ना. अजितदादांचा अहंकार बोलतोय, ते नैराश्यात आहेत, अशी घणाघाती टीका लांडगेंनी केली. पिंपरी चिंचवडमधील भ्रष्टाचाराचा आका संपवायचा आहे, असा आरोप ना. अजितदादांनी केल्यानंतर लांडगेही निवडणुकीच्या आखाड्यात उतरलेत. स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपमध्ये आलेल्या ना. अजितदादांनी आमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करु नयेत असे लांडगे म्हणाले. मुलगा पार्थ पवारांचे पराक्रम पाहा असेही लांडगे म्हणाले. जे स्वतःच्या काकाचे होऊ शकले नाहीत, ते पिंपरी चिंचवडचे होतील का? असा सवाल देखील लांडगेंनी केला आहे.

काय म्हणाले ना. अजितदादा पवार?
दरम्यान, महेश लांडगेंच्या टीकेवर बोलताना ना. अजितदादा म्हणाले, की, मी कोण आहे जनता ठरवेल. १५ तारखेपर्यंत कळ काढा उत्तर देतो. राष्ट्रवादीकडून एक अलार्म पाच काम हे कँपेन सुरू होत आहे. पुण्यातील खड्डे, कचरा, गुन्हेगारी, पाणीटंचाई या मुद्द्यांवर रॅप साँगमधून भाजपच्या कारभारावर टीका करण्यात आली आहे. हे गाणे पुणे आणि पिंपरी चिंचवडच्या कारभाराबद्दल आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या कारभाराबाबत हे नसल्याची माहिती ना. अजितदादांनी दिली. कचरा, वाहतूक कोंडी, तुटलेले रस्ते, पाणीटंचाई, गुन्हेगारी हे पुण्याचे अलार्म आहेत, असे मत ना. अजितदादांनी व्यक्त केले. आपण जे गाणे तयार केले आहे ते पुणे आणि पिंपरी चिंचवडपुरते मर्यादित आहे. केंद्र आणि राज्य सरकार याचा कुठेही संबंध नाही, असेही ना. अजितदादा म्हणाले.

**सुप्रिया सुळे प्रचारात का येत नाहीत?**

खासदार सौ. सुप्रियाताई सुळे प्रचारात का येत नाहीत? असा सवाल देखील ना. अजितदादांना विचारण्यात आला. यावेळी ना. अजितददा म्हणाले, की खासदार अमोल कोल्हे, निलेश लंके यांच्याशी बोलणे झालं आहे, ते प्रचाराला येणार आहेत. राज्यभर निवडणूक आहेत सगळे जिथे- तिथे प्रचार करत आहेत. पुण्याची मेट्रो मनमोहन सिंग यांच्या काळात मंजूर झाल्याचे ना. अजितदादा म्हणाले.

# राज्यातील १२ हजारांवर शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीचा मुहूर्त गवसला

## ग्रामविकास विभागाच्या हालचालींना वेग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या आंतरजिल्हा बदली प्रक्रियेचा सातवा टप्पा लवकरच सुरू होणार आहे. याबाबत प्रधान सचिवांनी राज्यातील सर्व शिक्षणाधिकाऱ्यांसोबत नुकतीच बैठक घेऊन सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यामुळे आंतरजिल्हा बदलीचा मुहूर्त सापडल्याचा दावा प्रहार शिक्षक संघटनेने केला आहे. जिल्हा परिषदेंतर्गत कार्यरत शिक्षक संवर्गाची गेल्या तीन वर्षांपासून रखडलेली आंतर जिल्हा बदलीप्रक्रिया तत्काळ सुरू करण्यात यावी. अन्यथा प्रहार शिक्षक संघटनेच्या वतीने मुंबई आझाद मैदानावर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा प्रहार शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष महेश ठाकरे यांनी दिला होता.

> “जिल्हा परिषद शिक्षकांची आंतरजिल्हा बदली प्रक्रिया रखडली होती. याबाबत ग्रामविकास विभागाने सकारात्मक दखल घेतली आहे. आंतरजिल्हा बदलीबाबत कार्यवाही सुरू केली आहे. बदली प्रतीक्षेतील १२ हजारांवर शिक्षकांना न्याय मिळणार असल्याचे समाधान आहे. मात्र, तसे न झाल्यास पाठपुरावा सुरूच राहील.
> **–महेश ठाकरे,** राज्याध्यक्ष, प्रहार शिक्षक संघटना.

आंतरजिल्हा बदलीचा सातवा टप्पा कार्यान्वित करण्यापूर्वी सर्व जिल्हा परिषदांना शिक्षक संवर्गाचे रोस्टर अद्ययावत करण्याच्या कालमर्यादित सूचना द्याव्यात. पेसा क्षेत्रातील जिल्ह्यात शासननिर्णयानुसार पेसा क्षेत्रात २० टक्के व नॉन-पेसा क्षेत्रात ८० टक्के रिक्त पदे आंतरजिल्हा बदलीप्रक्रियेकरिता उपलब्ध करून देण्यात यावी. आंतरजिल्हा बदलीप्रक्रियेत उर्दू माध्यमाच्या शिक्षकांना आरक्षित पदावर उमेदवार उपलब्ध न झाल्यास ती पदे शिक्षक भरतीप्रमाणे खुल्या प्रवर्गाकरिता परावर्तित करण्यात यावी. आंतरजिल्हा बदलीप्रक्रियेसाठी ३१ मे २०२६ अखेरपर्यंतचे रिक्त पदे गृहीत धरण्यात यावी. आंतरजिल्हा बदलीप्रक्रियाकरिता स्वतंत्र वेळापत्रक निर्गमित करण्यात यावे आदी मागण्या करण्यात आल्या होत्या.

# राष्ट्रीय क्रिकेट स्पर्धेसाठी ‘प्रताप’च्या पाच युवती खेळाडूंची निवड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : प्रताप महाविद्यालयातील निवड झालेल्या खेळाडूंसमवेत प्रशिक्षक.

अमळनेर : येथील प्रताप महाविद्यालयातील सृष्टी शिंदे, भाग्यश्री पाटील, धनश्री पाटील, नंदिनी जाधव व प्राची शिरसाठ यांची बनस्थली विद्यापीठ निवाई (राजस्थान) येथे होणाऱ्या आंतर विद्यापीठ राष्ट्रीय क्रीकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. १२ ते १९ जानेवारी दरम्यान हे सामने होणार आहेत. आंतर महाविद्यालय आणि विभागीय स्पर्धेत निवड होऊन युवती क्रिकेटपटूंनी अखिल भारतीय राष्ट्रीय स्पर्धेत स्थान मिळविले आहे.

त्यांच्या यशाबद्दल खानदेश शिक्षण मंडळाचे मावळते कार्याध्यक्ष डॉ. संदेश गुजराथी, मावळते कार्योपाध्यक्ष नीरज अग्रवाल, सचिव प्रा. पराग पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, सर्व उपप्राचार्य, आयक्यूएसी व रूसा समन्वयक डॉ. मुकेश भोळे, जिमखाना समन्वयक व अधिसभा सदस्य डॉ. संदीप नेरकर, निवड समितीप्रमुख डॉ. देवदत्त पाटील, एरंडोल विभागाचे सचिव डॉ. शैलेश पाटील, कुलसचिव राकेश निळे, सर्व जिमखाना समिती सदस्य, क्रिकेट संघ व्यवस्थापक डॉ. सचिन पाटील, क्रीडा शिक्षिका प्रा. अर्चना पाटील, प्रा. ए. के. अग्रवाल, मिलिंद शिंदे, संजय पवार, प्रशांत देवकते, प्रताप महाविद्यालय प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले आह.

## ‘पोलीस- पत्रकार महोत्सव’

# अमळनेरात विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान

**ग्लोबल महातेज वृत्मतसेवा**



अमळनेर : पोलीस व पत्रकार महोत्सवात मान्यवरांच्या सत्कार प्रसंगी उपस्थित पोलीस व पत्रकार बांधव आदी

अमळनेर : येथील महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व पोलीस प्रशासनातर्फे पत्रकारदिनाच्या पार्श्वभूमीवर मंगळवार, दि. ६ जानेवारी रोजी सायंकाळी श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात ‘पोलीस- पत्रकार महोत्सव’ उत्साहात झाला. याप्रसंगी शहर व तालुक्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. माजी केंद्रीय मंत्री अ‍ॅड. विजय नवल पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे अध्यक्षस्थानी होते. पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील आदींसह राजकीय, प्रशासकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी दर्पणकार बाळशास्त्री जांबेकर व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ (मुंबई) शाखा अमळनेरच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी महोत्सव यशस्वितेसाठी सहकार्य केले.

**हे आहेत सन्मानार्थी**

आमदार अनिलदादा पाटील व ख्यातनाम बिल्डर्स ओमप्रकाश मुंदडा (अमळनेर भूषण). अ‍ॅड. विजय नवल पाटील व भिकन पाटील (शिक्षण महर्षी). शिवाजीराव पाटील (साहित्य रत्न). पांडुरंग पाटील (जीवन गौरव, पत्रकारिता) श्री मंगळग्रह मंदिर देवस्थान (आदर्श देवस्थान). डॉ. जी. एम. पाटील (आरोग्य देवदूत). डॉ. प्रशांत शिंदे (आदर्श आरोग्य सेवादूत). महेश पाटील (आदर्श लोकसेवक). वाहतूक पोलीस विभाग (उत्कृष्ट सेवा). सिद्धांत सिसोदे (आदर्श पोलीस कर्मचारी). अनिता सुरडकर (आदर्श शिक्षिका). कैलास पाटील (उद्योगरत्न). विक्की जाधव (आदर्श उद्योजक). प्रितेश पारख, रोनक संकलेचा, जितेंद्र गुंजाळ, प्रेमकुमार सासनाणी (युवा उद्योजक). किरण (कृष्णा) बहारे (समाज भूषण). ज्ञानेश्वर धनगर (आदर्श समाजसेवक). सौ. रिता बाविस्कर (आदर्श सामाजिक कार्यकर्त्या). प्रवीण पाटील (उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ता). डिगंबर वाघ (उत्कृष्ट अभियंता). एकनाथ सोनवणे (आदर्श वृत्तपत्र वितरक). गोविंद गायकवाड (उत्कृष्ट गायक). रवींद्र भोई (उत्कृष्ट कलाकार). अजय शिवरामे (आदर्श कर्मचारी). पारस गोल्ड (आदर्श सुवर्णकार). नितीन पाटील (आदर्श सरपंच).

# गलवाडे रस्त्यावर ‘रंबेल स्ट्रिप’चे काम पूण

**पान १ वरून :**

आमदार अनिलदादा पाटील यांनी कार्यकरी अभियंत्यांना याबाबत पर्याय काढून हे काम करावे, अशा सूचना दिल्या होत्या. काही ठिकाणी झालेल्या स्पीड ब्रेकरचे दाखलेही दिले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी याची तत्काळ दखल घेतली. कंत्राटदार बी. आर. भदाणे यांना आदेश देऊन रंबेल स्ट्रिपचे काम करण्यास सांगितले होते. त्याअनुषंगाने बुधवार, दि. ७ जानेवारी रोजी श्री. भदाणे यांचे सुपरव्हाझर महेश शिसोदे यांनी स्ट्रिपचे काम पूर्ण केले. मनोज पाटील यांना स्पॉटवर बोलावून पाहणीही केली आहे. यावेळी परिसरातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांनी आमदार अनिलदादा पाटील व मनोज पाटील यांचा ऋणनिर्देश केला आहे. याप्रसंगी धनंजय वानखेडे, किरण पाटील, सुशील परील, नामदेव पाटील, चैतन्य संदानशिव, जय पाटील, प्रशांत हरहरे, मनीष पाटील, सुधाकर पाटील, जुबेर पठाण, अथर्व पाटील, नूतन पाटील, नेहा परदेशी, आशाबाई पाटील आदी उपस्थित होते.

भूतदया हीच खरी ईश्वर सेवा ॥
अमळनेरकर
नागरिकांना कळकळीचे
आवाहन
लख्ख ऊन... कोरडा घसा... आणि घामाच्या धारा!
पुढच्या काही दिवसांत उन्हाचा तडाखा वाढणार आहे. आपण माणसे ‘पाणी-पाणी’ करतो तेंव्हा त्या मुक्या पशू-पक्ष्यांचं काय? संत ज्ञानेश्वर आणि जगद्गुरू तुकोबारायांनी आपल्याला ‘भूतदया’ शिकवली. त्यास अनुसरून कडक उन्हात पाण्यासाठी व्याकुळ झालेल्या एका पाखराची तहान भागवणे, हीच मोठी मानवता आहे.
आपण काय करू शकतो?
१) गॅलरीत किंवा छतावर: पक्ष्यांसाठी एका मातीच्या भांड्यात स्वच्छ पाणी ठेवा.
२) दाराबाहेर: भटक्या कुत्र्यांसाठी किंवा जनावरांसाठी पाण्याच्या कुंडीची सोय करा.
३) शक्य असल्यास इतरांनाही मातीची भांडी किंवा पाण्याची पात्रे भेट देऊन प्रोत्साहित करा.
“वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे...”
आपल्या एका छोट्या प्रयत्नाने एखाद्या जीवाचा प्राण वाचू शकतो!
चला, या उन्हाळ्यात माणुसकीचं ‘पाणी’ पाजूया!
विनीत
व्हॉइस ऑफ मीडिया
(Voice of Media) शाखा: अमळनेर
VOICE OF MEDIA
सर्व वृत्तपत्र वाचकांना कळकळीची प्रार्थना
कृपया उन, वारा, पाऊसाची तमा न बाळगता रोज सकाळी गावभर फिरफीर करून आपल्याला घरपोच वृत्तपत्र आणून देणाऱ्या वृत्तपत्र एजंटांना नियमित व वेळेवर पेपरचे बिल देवून सहकार्य करा...! थोड्याश्या बिलासाठी त्यांना पुन्हा-पुन्हा फिरफीर करायला लावू नका...!

# “आयतं-पोयतं सख्यानं” ने गाजवला रंगमंच

## प्रताप महाविद्यालयातील एकपात्री नाट्य कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : प्रताप महाविद्यालयात ‘आयतं-पोयतं सख्यानं’चे सादरीकरण करताना प्रविण माळी व समोर उपस्थित श्रोते.

अमळनेर : येथील खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालयाच्या मराठी विभाग आणि राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांच्यातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त “एकपात्री नाट्य कार्यशाळा” बुधवार, दि. ७ जानेवारी रोजी प्रताप महाविद्यालयातील पू. साने गुरुजी सभागृहात झाली. शिरपूर येथील सुप्रसिद्ध कलावंत प्रवीण माळी मार्गदर्शक होते. त्यांच्या ‘आयतं पोयतं सख्यानं’ ने रंगमंच चांगलाच गाजवला.

ही कार्यशाळा दोन सत्रात पार पडली. सकाळच्या सत्रात प्रवीण माळी यांनी एकपात्री नाटकाची संकल्पना, त्याचा ऐतिहासिक प्रवास, आशय निवड, व्यक्तिरेखा उभारणी, संवादफेक, आवाजातील चढ-उतार, देहबोली, हालचाली तसेच प्रेक्षकांशी थेट संवाद साधण्याच्या विविध पद्धती यावर मार्गदर्शन केले. एकपात्री नाटक हे केवळ अभिनयाचे माध्यम नसून कलाकाराच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे प्रभावी प्रकटीकरण करणारे कलारूप आहे, हे पटवून दिले.
दुपारच्या सत्रात श्री. माळी यांनी ‘आयतं पोयतं सख्यानं’ या अहिराणी एकपात्री नाटकाचे प्रभावी सादरीकरण केले. त्यांच्या सादरीकरणातून भावनिर्मिती, भाषेचे विविध लहेजे, हालचाली आणि रंगमंचावरील उपस्थिती यांचे सूक्ष्म बारकावे प्रेक्षकांसमोर उलगडले.
महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव, उपप्राचार्य डॉ. कल्पना पाटील, डॉ. व्ही. बी. मांटे, डॉ. तोरवणे, डॉ. रमेश माने, प्रा. योगेश पाटील, डॉ. विलास गावीत, डॉ. नीलेश चित्ते, ग्रंथपाल दीपक पाटील, डॉ. अरविंद भंडारे (पारोळा), प्रा. तुषार पाटील, प्रा. गोपाल बडगुजर आदींसह विविध विभागांतील प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.
मराठी विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. सागर सैंदाणे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. गोपाल बडगुजर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ज्ञानसागर सूर्यवंशी यांनी आभार मानले.




# श्री महालक्ष्मी अष्टकाची कथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पूर्वीच्या काळी भल्या पहाटे म्हणजे पंचपंचउषःकाली सर्व योगी, तपस्वी व ऋषीमुनी पृथ्वीवरून देवलोकांत महाविष्णूंच्या दर्शनासाठी जात असत. असेच एकदा साक्षात शिवअवतार असलेले व अत्री अनुसयेचे पुत्र श्री दुर्वास महर्षी देवलोकांत निघाले होते. महर्षी दुर्वास म्हणजे साक्षात महादेव असून, अत्यंत कोपिष्ट होते. ते देवलोकांत महाविष्णूंच्या दर्शनासाठी पोहोचले. आपला भक्त आल्याचे पाहून श्री विष्णूंना अत्यानंद झाला व आनंदाने त्यांनी स्वतःच्या गळ्यातील वैजयंती माला महर्षी दुर्वासांच्या गळ्यात घातली. महालक्ष्मींना आश्चर्य वाटले. माझे पती, मला कधी ती वैजयंती माला दिली नाही आणि आज महर्षी दुर्वासांना दिली. असो. दर्शन घेऊन महर्षी दुर्वास परतीच्या प्रवासाला लागले. महर्षी दुर्वास हे महातपस्वी व साक्षात भगवान शिवशंकरच असल्याने ते पूर्णपणे विरक्त वृत्तीचे होते. त्यांनी ती माळ कोणाला तरी देण्याचे ठरवले. त्या हेतूने ते पाहत चालले असता वाटेत त्यांना देवराज इंद्र देवलोकी महाविष्णूंच्या दर्शनाला जात असलेले आढळले. त्यांनी स्वतःच्या गळ्यातील ती वैजयंती माला इंद्रदेवांना दिली व ते निघून गेले. इंद्रदेवांनी विचार केला, की अगोदरच आपल्या खजिन्यात इतक्या किमती माळा धूळ खात पडल्या आहेत; त्यात हीची भर कशाला? असा विचार करून त्यांनी ती माळ आपल्या ऐरावताच्या गळ्यात घातली.

हे सर्व महालक्ष्मी पाहत होत्या. आपल्या पतीच्या गळ्यातील वैजयंती माला इंद्रदेवांनी ऐरावताच्या गळ्यात घातली, हे पाहून महालक्ष्मी इंद्रदेवांवर प्रचंड संतापल्या व त्यांनी रागाने तोंड फिरवले. कारण पतीचा अपमान पत्नीला कधीही सहन होत नाही.



साक्षात महालक्ष्मीच रागावल्यामुळे इंद्राचे सारे वैभव एका क्षणात नाहीसे झाले. इंद्र घाबरला. तो भगवान श्री विष्णूंकडे क्षमायाचना करू लागला. विष्णू म्हणाले, की तू महालक्ष्मींची क्षमा माग. तेव्हा इंद्र म्हणाला, की मला देवींची भीती वाटते. देवींच्या हातात तलवार आहे, शंख, चक्र, गदा आहे. तेव्हा भगवान विष्णू म्हणाले, की सिंहीणीच्या पिल्लांना सिंहीणीची भीती कधीच वाटत नाही. मुलाने खोडसाळपणा केला तर आई रागावणे साहजिक आहे. पण माफी मागणे हा त्यावरील उपाय आहे. माफी मागतेवेळी जर मुलाने आईच्या गळ्याला लाडीकपणे मिठी मारली तरी आई त्याचे हात झटकून टाकेल, आईच्या कमरेला मिठी घातली तरी आईचा राग फारसा शांत होणार नाही. पण जर कोणत्याही मुलाने जाऊन आईचे पाय धरले तर जगात अशी एकही आई नाही जी त्याला लाथाडेल. महालक्ष्मी तर जगत्जननी आहेत. अखिल विश्वाच्या त्या माता आहेत. म्हणून तू जाऊन त्यांच्या पायाला मिठी मार. त्याप्रमाणे इंद्रदेवांनी आई महालक्ष्मींच्या पायाला मिठी मारली आणि नतमस्तक झाले. तत्क्षणी जगत्जननी जगदंबा महालक्ष्मींच्या डोळ्यातून खळ्ळकन् अश्रू ओघळले. कारण कितीही झाले तरी शेवटी ती आईच आहे. त्यातील दोन अश्रू देवराज इंद्रांच्या मस्तकी पडले. महालक्ष्मींनी इंद्रदेवांना क्षमा केली. तेव्हा इंद्रदेवांना स्फुरलेले ' श्री महालक्ष्मी अष्टक ' जे आज घराघरांत म्हटले जाते. महालक्ष्मी अष्टक हे अत्यंत प्रभावी असून, भक्तावरील सर्व प्रकारची संकटे दूर करून संकटांचा सर्वनाश करण्याची शक्ती या स्तोत्रात आहे. हे स्तोत्र अनन्य भावाने म्हटले असता आई जगदंबा प्रसन्न झाल्यावाचून राहणार नाही.

**॥ श्री महालक्ष्म्यष्टकम् ॥**

श्रीगणेशाय नमः

नमस्तेस्तू महामाये श्रीपिठे सूरपुजिते ।
शंख चक्र गदा हस्ते महालक्ष्मी नमोस्तूते
॥ १ ॥
नमस्ते गरूडारूढे कोलासूर भयंकरी ।
सर्व पाप हरे देवी महालक्ष्मी नमोस्तूते ॥
२ ॥
सर्वज्ञे सर्ववरदे सर्वदुष्ट भयंकरी ।
सर्व दुःख हरे देवी महालक्ष्मी नमोस्तूते ॥
३ ॥
सिद्धीबुद्धीप्रदे देवी भुक्तिमुक्ति प्रदायिनी ।
मंत्रमूर्ते सदा देवी महालक्ष्मी नमोस्तूते
॥ ४ ॥
आद्यंतरहिते देवी आद्यशक्ती महेश्वरी ।
योगजे योगसंभूते महालक्ष्मी नमोस्तूते
॥ ५ ॥
स्थूल सूक्ष्म महारौद्रे महाशक्ती महोदरे ।
महापाप हरे देवी महालक्ष्मी नमोस्तूते
॥ ६ ॥
पद्मासनस्थिते देवी परब्रम्हस्वरूपिणी ।
परमेशि जगन्मातर्र महालक्ष्मी नमोस्तूते
॥ ७ ॥
श्वेतांबरधरे देवी नानालंकार भूषिते ।
जगत्स्थिते जगन्मार्त महालक्ष्मी नमोस्तूते
॥ ८ ॥
महालक्ष्म्यष्टकस्तोत्रं यः पठेत्
भक्तिमान्नरः ।
सर्वसिद्धीमवाप्नोति राज्यं प्राप्नोति
सर्वदा ॥ ९ ॥
एककाले पठेन्नित्यं महापापविनाशनं ।
द्विकालं यः पठेन्नित्यं धनधान्य समन्वितः
॥१०॥
त्रिकालं यः पठेन्नित्यं महाशत्रूविनाशनं ।
महालक्ष्मीर्भवेन्नित्यं प्रसन्ना वरदा शुभा
॥११॥
॥ इतिंद्रकृत श्रीमहालक्ष्म्यष्टकस्तवः
संपूर्णः ॥

# नाम हेच परमेश्वराची भेट करवून देईल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गंगेचा किंवा इतर कोणत्याही नद्यांचा उगम जर आपण पाहिला, तर एक-एक थेंब स्वच्छ पाणी तेथून खाली पडत असलेले आपल्याला दिसेल. पूर्वपुण्याईमुळे आयुष्यात परमार्थाचा उगमही असाच लहान मात्र अगदी स्वच्छ असतो. पुढे त्या स्वच्छ झऱ्याचे नदीत रूपांतर होते. अनेक ठिकाणांहून वाहत आल्याने तिचे पाणीही काहीसे गढूळ बनते. तसेच आपले जीवनही व्यवहारातील बऱ्या-वाईट गोष्टींच्या सान्निध्यामुळे पुढे गढूळ बनत जाते. परंतु ज्याप्रमाणे पाण्याला तुरटी लावली म्हणजे पाणी स्वच्छ होऊन सर्व गाळ तळाशी राहतो त्याप्रमाणे कोणतेही काम करताना नाम घेतले तर त्या कर्माचे गुणदोष तळाशी बसून वर निर्मळ जीवनाचा प्रत्यय येतो. कोणीही दाढीवाला साधू येऊन सांगू लागला, की परमार्थ असा आहे, तसा आहे, तर तुम्ही खुशाल छातीवर हात ठेवून सांगा की नामाशिवाय परमार्थच नाही. कर्म करताना नाम घेऊन समाधानात राहणे हाच खरा परमार्थ. भगवंताचे प्रेम यायला, त्याच्याबद्दल आपलेपणा वाटायला, नामासारखे साधन नाही. आपलेपणाचे प्रेम किती असते पाहा. एक मुलगा आईजवळ राहत होता. पुढे त्याचे लग्न झाले. त्याने बायको आपली मानली, तिच्याबद्दल त्याला प्रेम उत्पन्न झाले. पुढे ती जरा कृश झाली. त्याला वाटले, ही शहाणी आहे, बोलत नाही, परंतु हिला आपल्या आईचा जाच असला पाहिजे. म्हणून तो वेगळा निघाला. आपले म्हटल्याने केवढे प्रेम उत्पन्न होते पाहा. तेव्हा परमेश्वर आपलासा होण्यासाठी नामाच्या योगाने त्याच्यापाशी आपलेपणा निर्माण केला पाहिजे. प्रभू श्रीरामचंद्रांचे प्रेम हे त्याच्या नामाच्या संगतीनेच येऊ शकेल. नुसते पुस्तक वाचून परमार्थ सांगणारे भेटतील, पण आचरणात आणून सांगणारे विरळाच. किती, किती म्हणून प्रपंच केला तरी अपुराच पडतो. एखादा म्हातारा माणूस आपण पाहिला तर त्याचा संसार खरे पाहू जाता सर्व झालेला असतो. मुले-बाळे असतात, सर्व तऱ्हेने तो सुखी असतो. परंतु मरणसमयी म्हणतो, नातवाची मुंज पाहिली असती तर बरे झाले असते. माणूस वासनेत कसा गुंतलेला असतो ते यावरून कळेल. संसार कितीही केला तरी तो पुरा होऊ शकत नाही, तो अपूर्णच राहतो. मनुष्याच्या जीवनाची तळमळ परमेश्वरप्राप्तीशिवाय शमूच शकत नाही. त्याच्या जीवाला समाधान एका परमेश्वरभेटीतच मिळू शकते आणि याकरिता आयुष्याच्या सुरूवातीपासूनच नामाची कास धरा. हेच नाम मृत्युसमयी तुम्हाला परमेश्वराची भेट करवून देईल, याची पूर्ण खात्री बाळगा. अत्यंत गुह्यातील गुह्य जे आहे ते मी तुम्हाला सांगतो. नामाचे प्रेम हेच ते गुह्य होय. आपण मागितलेले भगवंत पुरवू लागला, तर त्याला आपल्यासाठी चोवीस तास राबावे लागेल आणि इतके करून आपले अपुरेच राहील.



# जागृत कुळाचा पाटा : घरातील देव्हारा म्हणजे जिवंत दिव्य ऊर्जेचे केंद्र

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कोकणात आणि विशेषतः आपल्या गाव संस्कृतीत देवघर, देव्हारा किंवा जागृत कुळाचा पाटा ही केवळ पूजा ठेवण्याची जागा नसते, तर ती आपल्या घराला, वंशाला आणि कुलाला संरक्षित ठेवणारी एक जिवंत आध्यात्मिक शक्ती असते. आपण बहुतांशी घरांमध्ये पाहतो की कुलदेवतेच्या नावाने घरात कळस बसवला जातो. त्या कळसामध्ये २४ तास पाणी भरलेले असते आणि त्यावर श्रीफळ म्हणजे नारळ ठेवलेला असतो. घरातील महिला गुरुवारी किंवा शुक्रवारी नियमाने ते पाणी बदलतात. मात्र, तोच नारळ वर्षभर राहतो. या नारळाला कोंब फुटतो. तत्त्वांच्या नावाने हे नारळ ठेवले गेलेले आहेत त्यांनी आपली प्रचिती दाखवून दिली आणि सर्वांना कोंब आलेले आहेत. हे स्पष्ट उदाहरण आहे, की तत्व तिथे उपलब्ध आहेत आणि त्या देवता काम करतात. त्यात काही शंका नाही. जर शुद्ध देवारा किंवा पाटा असेल तिथे गेल्यानंतर जाणीव होते त्या ऊर्जेचे, त्या सकारात्मक ऊर्जेची. हे कोणते साधे योगायोग नाहीत. हे केवळ एका नारळावर आलेले कोंब नाहीत. हे जागृत तत्वाचा जिवंत प्रत्यय आहे. ज्या देवतांच्या नावाने हे नारळ ठेवले जातात, त्या देवतांचे तत्त्व घरात उपस्थित राहते आणि आपली प्रचिती दाखविते. ज्या देव्हाऱ्यात शुद्धता, श्रद्धा आणि नियम पाळले जातात तिथे गेल्यावर आपणास सकारात्मक, शांत आणि दिव्य ऊर्जेची जाणीव होते. या ऊर्जेचा अनुभव शब्दात सांगता येत नाहीतो मनाने, भावनेने आणि आत्म्याने जाणवतो. कुलदेवता केवळ देव नाहीत, तर आपला आध्यात्मिक वारसा. कुलदेवता म्हणजे आपल्या घराण्याचे रक्षण करणारी शक्ती, पिढ्यान्पिढ्या सोबत असलेला दैवी आधार. संकट काळात रक्षा करणारा आध्यात्मिक कवच, कुलदेवतेचा जागृत पाटा म्हणजे देवतेचे स्थायी निवासस्थान, श्रद्धेचे केंद्र, घरातील सुख, समृद्धी आणि शांतीचा पाया.



जेव्हा घरातील लोक शुद्ध मनाने नित्य पूजा करतात, नियम पाळतात, श्रद्धा ठेवतात तेव्हा देवता केवळ पूजेत नाही तर जीवनात कार्यरत असते. आजार, संकट, अडचणी, अडथळे हे सारे कमी होत जातात. घरात एक वेगळी स्थैर्यशक्ती निर्माण होते.

देव्हाऱ्यातील ऊर्जेची जाणीव का होते?

कारण ती जागा सतत मंत्र, नामस्मरण आणि पूजेने ऊर्जित असते. तिथे सात्विकता, शांतता आणि भक्तीचा प्रवाह सतत चालू असतो. कुलदेवतांचे तत्व तिथे सक्रिय असते. अशा देव्हाऱ्यात उभे राहिले की मन स्थिर होते. विचार शांत होतात आणि जाणीव होते की " हे फक्त लाकडाचा पाटा नाही ही सजीव, जागृत, दिव्य उपस्थिती आहे. "



# आई रेणुकामाता : श्रद्धा व परंपरेचे प्रतीक

श्री रेणुकामाता ही मातृशक्तीचे आद्यस्वरूप मानली जाते. माहूर येथील रेणुकामातेच्या परंपरेत तांदळारूप मूर्ती ही अत्यंत पवित्र व श्रद्धेची मानली जाते. ही मूर्ती केवळ पूजेची वस्तू नसून, ती मातेच्या सजीव कृपेचे प्रतीक आहे, अशी भक्तांची भावना आहे.

परंपरेनुसार या शिळेवर शेंदूर, गुगुळ, राळ आणि ताजे लोणी यांचा लेप केला जातो. शेंदूर देवीच्या शक्तीचे व संरक्षणाचे प्रतीक आहे, तर गुगुळ व राळ शुद्धीकरण आणि स्थैर्य दर्शवितात. लोणी हे सात्त्विकता, मातृत्व व करुणेचे द्योतक मानले जाते. काही ठिकाणी या शिळेचा संबंध मातृतीर्थ तलावाशी जोडला जातो. ज्यामुळे देवीचे स्वयंभू व स्थानिक स्वरूप अधिक दृढ होते.
घरी ही तांदळा ठेवून पूजा केल्यास घरात सुख, शांती, आरोग्य व संकटांपासून संरक्षण मिळते, अशी भक्तांची श्रद्धा आहे. मात्र, ही मूर्ती श्रद्धेने, नियमपूर्वक आणि शक्यतो परंपरा जाणणाऱ्या पुजाऱ्यांकडूनच घ्यावी, असे मानले जाते.
अखेर, रेणुकामातेची पूजा ही केवळ विधी नसून भाव, श्रद्धा आणि शुद्ध मनाने केलेली उपासना आहे. मातेची कृपा मूर्तीत नसून भक्ताच्या विश्वासात असते.

# सार्थ पुरुष सूक्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पुरुष सूक्ताचे महत्व आणि फलश्रुती हे हिंदू धर्मातील ऋग्वेदातल्या दहाव्या मंडळातील एक प्रमुख सूक्त किंवा मंत्र संग्रह आहे. हे सूक्त संस्कृत भाषेमध्ये आहे. पुरुष सूक्तामध्ये विराट अशा पुरुषाचे वर्णन आहे. त्या विराट पुरुषाला वैदिक ईश्वराचे स्वरूप मानले गेले आहे. या सुक्तामध्ये चातुर्वर्ण, मन, प्राण, इंद्रिये, आदी शारीरिक व नैसर्गिक बाबींचा उल्लेख आहे. यात यज्ञाचे वर्णनही केले आहे. षोडशोपचार पूजा करताना पुरुष सूक्तातील एक- एक ऋचा एक एक उपचारासाठी वापरली जाते.

**फलश्रुती :**
भगवंताची असीम कृपा व सर्व प्रकारच्या पापमुक्तीसाठी पुराणात पुरुषसूक्त सर्वश्रेष्ठ मानले जाते. या सूक्ताचे नित्यनियमित एकदा पठण केल्यास या जन्मामधील घडलेल्या पापांपासून मुक्ती मिळते. या सूक्ताचे नित्यनियमित पाच वेळा पठण केल्यास या जन्मामधील घडलेल्या पापांपासून मुक्ती मिळतेच. शिवाय पूर्वजन्मामधील पापांपासून देखील मुक्ती मिळते.

**पुरुषसूक्त आणि त्याच्या प्रत्येक ऋचेचा अर्थ :**

**हरीः ॐ सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् ।**
**स भूमिं विश्वतो वृत्वात्यतिष्ठद्दशांगुलम् ॥1॥**
**अर्थ :**
विराट अशा पुरुषाला सहस्र डोळे आणि सहस्र पाय आहेत. तो सर्व भूमीला सर्वस्वी व्यापून आणि दहा आंगुळे(बोटे) वर उरलाच आहे.

**पुरुष एवेदं सर्वं यद्भूतं यच्च भव्यम्।**
**उतामृतत्वस्येशानो यदन्नेनातिरोहति ॥ २॥**
**अर्थ :**
हे विद्यमान जग म्हणजेच हा विराट आदी पुरुषच आहे. अमृततत्त्वाचा स्वामी हाच आहे. त्याला केवळ इच्छा झाली, म्हणूनच तो प्राणिमात्रांना निमित्तभूत असे जे अन्न त्याद्वारे या जगात प्रकट झाला आहे.

**एतावानस्य महिमातो ज्यायांश्च पूरुषः।**
**पादोऽस्य विश्वा भूतानि त्रिपादस्यामृतं दिवि ॥ ३ ॥**
**अर्थ :**
याचा महिमा काय वर्णावा ? या सर्व दृश्य विश्वापेक्षा तो कितीतरी मोठा आहे. या विश्वातील सृष्टी हा केवळ एक चतुर्थांश भाग द्युलोकात आहे.

**त्रिपादूर्ध्व उदैत् पुरुषः पादोस्येहाभवत् पुनः।**
**ततो विष्वङ् व्यक्रामत् साशनानशने अभि ॥ ४॥**
**अर्थ :**
द्युलोकांत ज्योतिरूपाने राहिलेल्या या आदिपुरुषाचा एक अंश उत्पत्ती, स्थिती आणि लय अशा प्रकारे या विश्वात पुनः पुन्हा प्रकट होतो. सचेतन असे प्राणी समुदाय आणि अचेतन सृष्टी या सगळ्यात अनेक रूपांनी तो वावरत आहे.

**तस्माद्विराडजायत विराजो अधिपूरुषः।**
**स जातो अत्यरिच्यत पश्चाद् भूमिमथो पुरः ॥ ५॥**
**अर्थ :**
त्या आदिपुरुषापासून ज्याच्या ठायी विविध वस्तू झळकत असतात असा विराट देह उत्पन्न झाला. त्याच्या आश्रयाने एक पुरुष आपल्या मायेच्या शक्तीने ब्रह्मांड उत्पन्न करून स्वतः त्यातच प्रविष्ठ झाला आणि त्यातूनच पुढे अखिल सृष्टिजात निर्माण झाली.

**यत् पुरुषेण हविषा देवा यज्ञमतन्वत।**
**वसन्तो अस्या सीदाज्यम् ग्रीष्म इध्मः शरद्धविः ॥ ६॥**
**अर्थ :**
देवांनी नंतर या पुरुषाच्या स्वरूपाचाच हविर्भाग करून मानसिक यज्ञ आरंभिला. त्यात वसंत ऋतू हे तूप, ग्रीष्म हे इंधन आणि शरद हा हविःशेष कल्पिला.



**तं यज्ञं बर्हिषि प्रौक्षन्पुरुषं जातमग्रतः।**
**तेन देवा अयजन्त साध्या ऋषयश्च ये ॥ ७ ॥**
**अर्थ :**
त्या यज्ञसाधनभूत पुरुषावर प्रोक्षण करण्यात आले. त्या प्रथम झालेल्या जीवांनी यज्ञ केल्यामुळे सृष्टी उत्पन्न करण्यास समर्थ देव आणि सृष्टी संरक्षण करण्यास आवश्यक ज्ञान देणारे ऋषी उत्पन्न झाले.

**तस्माद् यज्ञात् सर्वहुतः संभृतं पृषदाज्यम् ।**
**पशून्तांश्चक्रे वायव्य नारण्यां ग्राम्याश्च ये ॥८॥**
**अर्थ :**
या यज्ञापासून दही, तूप इ. पोषणास आवश्यक असे पदार्थ तयार झाले. त्याच प्रकारे जे वायूवर पोसतात ते वन्य आणि ग्रामीण पशू हेही या यज्ञापासून तयार झाले.

**तस्माद्यज्ञात्सर्वहुत ऋचः सामानि जज्ञिरे।**
**छन्दांसि जज्ञिरे तस्माद्यजुस्तस्मादजायत ॥९॥**
**अर्थ :**
या यज्ञापासूनच ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि गायत्र्यादी छंद तयार झाले.

**तस्मादश्वा अजायंत ये के चोभयादतः।**
**गावो ह जज्ञिरे तस्मात्तस्माज्जाता अजावयः ॥१०॥**
**अर्थ :**
याच यज्ञापासून घोडे, दोन्ही बाजूंना दात असलेले इतर पशू- गाई, मेंढ्या वगैरे प्राणी तयार झाले.

**यत्पुरुषं व्यदधुः कतिधा व्यकल्पयन्**
**मुखं किमस्य कौ बाहू का ऊरू पादा उच्येते ॥११॥**
**अर्थ :**
जो हा विराट पुरुष उत्पन्न केला गेला तो किती प्रकारे उत्पन्न केला गेला ? त्याचे तोंड कोणते ? त्याचे हात, मांड्या आणि पाय कोणते म्हटले जाते ?

**ब्राह्मणोऽस्य मुखामासीद् बाहू राजन्यः कृतः।**
**ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ॥१२॥**
**अर्थ :**
त्या विराट पुरुषाचे ब्राह्मण हे मुख होते. क्षत्रिय हे बाहू, वैश्य हे मांड्या तसेच शूद्र हे पायांपासून उत्पन्न झाले.

**चंद्रमा मनसो जातश्चक्षोः सूर्यो अजायत।**
**मुखाद् इंद्रश्चाग्निश्च प्राणाद् वायु रजायत ॥१३॥**
**अर्थ :**
त्याच्या मनापासून चंद्र, डोळ्यापासून सूर्य, तोंडापासून इंद्र आणि अग्नी तसेच प्राणापासून वायू उत्पन्न झाला.

**नाभ्या आसीदंतरिक्षं शीर्ष्णोद्यौः समवर्तत।**
**पद्भ्यां भूमिर्दिशः श्रोत्रात्तथालोकाँ अकल्पयन्**
**॥१४॥**
**अर्थ :**
याच्या नाभीपासून आकाश, मस्तकापासून द्युलोक, पायापासून भूमी, कानापासून दिशा उत्पन्न झाल्या. सर्व लोक हे याच्यापासूनच उत्पन्न झाले आहेत.

**सप्तास्यासन्परिधयः त्रिःसप्त समिधः कृताः।**
**देवा यद् यज्ञं तन्वाना अबन्धन्पुरुषं पशुं ॥१५॥**
**अर्थ :**
या यज्ञात गायत्र्यादी सात छंद हे परिधी, आणि महिने, ऋतू, तिन्ही लोक व सूर्य मिळून एकवीस समिधा अशी कल्पना करून देव यज्ञ करू लागले. त्या विराट पुरुषाला त्यांनी यज्ञीय पशू कल्पिला.

**यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन्**
**ते ह नाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः संति**
**देवाः ॥१६॥**
**अर्थ :**
देवांनी यज्ञद्वाराचे याज्ञस्वरूप अशा प्रजापतीचे पूजन केले. तीच कृत्ये जगदुद्धार करणारी, जगाच्या वाढीला कारण झाली. ज्या ठिकाणी जगाच्या उत्पत्तीला साधक असणारे देव असतात, ते स्वर्गरूपी स्थान, त्यांची उपासना करणार्यांना प्राप्त होते.

(वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे.)